# कर्मयोगी

## प्राचार्य डॉ. शिवाजी दळणर सर

### सेवानिवृत्ती गौरवग्रंथ



पूनम प्रकाशन

**कर्मयोगी**
प्राचार्य डॉ. शिवाजी दळणर सेवानिवृत्ती गौरवग्रंथ

**संपादक**
प्रा. डॉ. संतोष चंपती हंकारे,
मराठी विभाग प्रमुख

**सर्व हक्क**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगाव

**मुखपृष्ठ**
संतोष धोंगडे मो. ९९२३५२५८८०

**छायाचित्र संकलन**
प्रा. डॉ. बालाजी शिंदे,
वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख

**अक्षर जुळवणी**
राहुल वाघमारे मो. ९८६००८३१३४

**मुद्रक** :

**आवृत्ती**
दिनांक ३० जून २०२०



**प्रेरणास्थान**

मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब
मा. मुख्यमंत्री, उध्दवजी ठाकरे साहेब
कै. माजीमंत्री शिवाजी बापू शेंडगे साहेब
कै. माजीमंत्री अंकुशरावजी टोपे साहेब

**मार्गदर्शक**

प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर
प्राचार्य डॉ. दिनानाथ फुलवाडकर
प्राचार्य डॉ. वसंत भोसले
प्रा. शमसोद्दीन तांबोळी

**प्राचार्य डॉ. शिवाजी दळणर सर गौरव समिती**

उपप्राचार्य डॉ. उत्तम देवकते
प्रा. डॉ. विठ्ठल डुमनर
प्रा. डॉ. बालाजी शिंदे
प्रा. डॉ. नरसिंगदास बंग
श्री. सोनसळे आर. बी.
श्री. गोर्वधन जोगदंड
श्री. प्रकाश बुगनर
प्रा. प्रकाश चौधरी
प्रा. सांगोळे एस. डी.
प्रा. मरेवाड पी. पी.
श्री. प्रकाश नानोर
श्री. किशन रोडे
श्री. विनायक दालपे

# अनुक्रमणिका


१. एक निष्ठावान भुमिपुत्र शिवाजी ते शिवाजीराव -प्राचार्य डॉ. दिनानाथ फुलवाडकर
२. आमचा मैत्रीबंध - प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर
३. माणूसकी जपणारा भला माणूस - प्राचार्य डॉ. वसंत भोसले
४. सच्चा मित्र विद्यार्थीप्रिय प्राचार्य- प्राचार्य डॉ. जी. आर. पगडे
५. सदैव चांगुलपणाच्या सुगंधान दखळणारं व्यक्तिमत्व - प्राचार्य डॉ. वसंत बिरादार
६. एक निर्भीड संघर्षशील व्यक्तिमत्व - डॉ. रवि सरोदे
७. अभेद्य मैत्रीचा प्रवास - ॲड. रंगनाथ राठोड
८. अमोद्य वक्तृत्वाचे धनी- प्राचार्य डॉ. विठ्ठल धुळें
९. १९७२ चा दुष्काळ आणि प्राचार्य डॉ. शिवाजी दळणर - प्रा. यादव गायकवाड
१०. ही तर गरूड झेप - किसन कांबळे वळसंगीकर - प्रा. यादव गायकवाड
११. मी पहिलेला कर्मयोगी प्रकाश नानोर, बोधडीकर
१२. प्राचार्य डॉ. शिवाजी दळणर : एक प्रेरक प्रवास- प्रा. डॉ. कीर्तीकुमार मोरे
१३. निश्चयाचा महामेरू- प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले 68 - 73
१४. सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व- प्रा. डॉ. विठ्ठल डुमनर
१५. माझी गुरूमाऊली डॉ. शिवाजी दळणर सर डॉ. श्रीधर बामकर
१६. बहुजन समाजातील कर्तृत्वान व्याक्तिमत्व - प्रा. डॉ. कांतराव पोले
१७. वात्सल्यसिंधू प्राचार्य डॉ.शिवाजीराव विठ्ठलराव दळणर- प्रा. डॉ. हरी पंढरी वंगरवार
१८. अजातशत्रु व्यक्तिमत्व- प्रा. काशिनाथ बाबुराव सालमोठे
१९. समाजशिक्षक- श्री विनायक गोविंदराव दालपे
२०. मला भावलेले सर - प्रा. डॉ. कालिदास गुडदे
२१. माझ्या जीवनाचे शिल्पकार - प्रा. रमेश जी. नरहीरे
२२. बहुजनांचे काळजी वाहक- संजय नामदेवराव आठवले.
२३. कार्यकर्तृत्वाचा दीपस्तंभ- प्रा. डॉ. संतोष हंकारे
२४. सामान्यांच्या ह्दयास भिडणारा देव माणूस - प्रा. डॉ. महेश मोठे
२५. संघर्षाचे दुसरे नाव- उपप्राचार्य डॉ. उत्तम शेषराव देवकते
२६. अभ्यासू व्यक्तिमत्व - प्रा.डा. कल्याण गोपनर
२७. आदर्श व्यक्तिमत्व- श्री मरेवाड पी. पी.
२८. प्राचार्य डॉ. दळणर सरांची सर नाही- प्रा. डॉ. नरसिंदास बंग
२९. एक हरहुन्नरी व्याक्तिमत्व-प्रा.डॉ. महावीर रामजी हाके
३०. विद्याधन वाटणारा शिक्षण तपस्वी- श्री गोवर्धन जी. जोगदंड
३१. प्रेमळ व्यक्तिमत्व - प्रा. डॉ. बालाजी लक्ष्मराव शिंदे





३२. अष्टपैल व्यक्तिमत्व - श्री किशन मारोती रोडे
३३. आदर्श प्रेरणादायी प्रशासक - श्री सुरनर संजय विक्रम
३४. प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व - श्री सुरनर संजय विक्रम
३५. माझे प्रेरणास्थान - प्रा. डॉ. सारिका विष्णू केदार
३६. एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व - प्रकाश चौधरी
३७. माझा देव - प्रा. शंकर धारबा घाडगे
३८. आमचे मार्गदर्शक - प्रा. डॉ. सिंधू परसराम खंदारे
३९. अहिल्यादेवी होळकर शिक्षण संस्थेचे प्रमुख - प्रा.डॉ. सदिपाली पांडे
४०. स्वकर्तृत्वाची जाणीव करुन देणारे व्यक्तिमत्त्व - प्रा. होनमाने यु.जी.
४१. योग्य दिशा दाखविणारे - प्रा. डॉ. बालाजी गव्हाळे
४२. बहुजनांचे आधारवड - प्रा. डॉ. विश्वनाथ रासवे
४३. युवकांचे आदर्श स्फूर्तीस्थान - मंगेश भूजंग भालेराव
४४. एक द्रष्टा स्थितप्रज्ञ निर्लेप समाजसेवक - रितेश काळे
४५. शून्यातून विश्व निर्माण करणारे सर - कु. विद्या कांबळे
४६. पंचकन्याचे वडील - सौ. महानंदा उत्तम देवकते
४७. मदतीचा हाथ खऱ्याला साथ देणारे - कु. उत्तरा देवकते
४८. एक शैक्षणिक दिपस्तंभ - प्रा. सांगुळे एस.डी.
४९. शुन्यातून विश्व निर्माण करणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व - प्रा. सुरेश वऱ्हाड


**कौटुंबिक लेख**


१. माझा भाऊराया माझा आधारस्तंभ - सौ. त्रिवेणी देविदास गोरे
२. माझ वडील - डॉ. प्रिया दळणर
३. आमच्या जीवनाचे शिल्पकार - माया शिवारजीराव दळणर
४. पप्पा आमचे माऊली - सूनयना दळणर (नाईक)
५. पितृभक्त माणे वडील परमेश्वराचे दुसरे रुप - सौ. किरण मंगेश गोरे
६. माझा मृत्युंजयी बाप - कोमल शिवाजीराव दळणर

# निश्चयाचा महामेरु

प्रा. डॉ.विठ्ठल जंबाले, देगलू

प्राचार्य डॉ. शिवाजीराव विठ्ठलराव दळणर यांच्या उन्नन चरित्राचे कथन (मी) उप लब्धर माहिती आणि सहवास- अनुभवांच्या साठवणीच्या आधाराने साधेल तेवढे सुसंगत के आहे. त्यामचे पर्यालोचन करणारांस त्यांच्यास ठायी वाखाणण्यासारखे विविध गुणांचे समुच्च कसे झालेले होते, विरोधकांनी त्यांच्यारवर जे दोष लादण्याचा किंवा गुण-कौतुक केले त्यामध्येल किती तथ्य आहे, हे सहज समजण्यासारखे आहे. तथापि अभियुक्त ग्रंथकाराच्या लेखन पद्धतीस अनुलक्षून गुणदोषांचे यथातथ्य स्वखरूप सामान्यत वाचकांच्या सोयीसाठ एकवटीने निर्देशित करणे उचित वाटते. हा मुख्य कथाभाग आटोपल्यावर कथानायकाच्या ठायी कोणते गुणावगुण आहेत व चरित्रकथनाने महाराष्ट्रीयास किंबहुना सामाजिक, राजकीय शैक्षणिक व क्षेत्रीय जगतास बोध प्राप्त होण्या सारखा आहे, याचे दिग्दर्शन करण्याचा अधिका चरित्रकारास आहे, हे जाणून पुढील गुण-दोषांचा मागोवा वाचकांपुढे मांडण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आदर्श विचारांना, तत्वांस, कार्याला आणि समकालीन वास्तवात अनुसरलेल्या मूल्यांना कवेत घेऊन वैयक्तिक जीवनात उन्नती कशी साधता येते, यांचा सुंदर परिपाठ म्हणजे वंदनीय दळणर सर. त्यांनी सभोवतालच्या वास्तव-ाशी समन्वियवृत्ती ठेवून शून्यातून विश्व निर्माण केले. ग्रामीण भागामध्ये राणीसावरगाव येथे जन्म झाला म्हणून मागासलेपणाचा लवलेशहील कधी मनाला स्पर्श होऊ दिला नाही. उला खडकाळ - डोंगराळ भागात नंदनवन उभे करता येते, याकरिता जिद्द, चिकाटी, प्रयत्न आणि दृढ निश्चायाच्यो बळावर क्रमशः यशोशिखरे पादाक्रांत करत 'निश्चीयाचे बळ मिळे फळ' याप्रमाणे जीवनभर झंझावात उभा केला. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशा वैविध्यपूर्ण क्षेत्रांमध्ये मैलाचा दगड ठरावा, अशी अतुल्ये यशस्वी कारकीर्द गाजविली. आत्मविश्वास, प्रचंड मेहनत, माणसे जोडण्याची आगळी हातोटी, मेहन-तीला यशामध्ये रूपांतरित करण्याची धमक, जनकल्याणाकरिता स्वेविश्वन अर्पण करण्याची धडपड या बळावर छत्रपती शिवाजी महाराजासारखे स्वराज्य निर्माण करणारे नावाप्रमाणे 'समकालीन प्रतिशिवाजी' ठरतात. भारतीय संविधानाच्या आदर्श मूल्यांना मध्यवर्ती ठेवून त्यांनी साकारलेले विश्व समर्थ रामदासांच्या. रचनेतील 'निश्चयाचा महामेरू बहुत जनांसी आधारू असे ज्यांच्याबद्दल म्हटले जाते त्या महामानवांच्या ऐतिहासिक वर्तनाशी आणि वर्णनाशी तैलनिकता दर्शविते. ते जसे--

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।
परोपकाराचिये राशी । उदंड घडती जयासी । तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैची ।।



..........................................................................
उदंड राजकारण तटले । तेणे चित्त विभागले । प्रसंग नसता लिहिले । क्षमा केली पाहिजे ।।
मराठा तितुका मेळवा महाराष्ट्र धर्म वाढवावा
आहे तितुके जतन करावे पुढे आणिक मेळवावे महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे

वरील काव्यतंक्तीतील वर्णनासादृश्य आपल्या समकालीन लौकिक कार्य करणारे दळणर सरांचे व्यजक्तित्व आणि कर्तृत्व सामान्य माणसाला पथदर्शी आहे. यशोशिखरमय कामगिरीचे निर्माण करणारे सर्वगुणसंपन्न वर्तमानातील मानवीमूर्ती आणि संघर्षशील धगधग-ते अग्रिकुंड म्हणजे कर्मयोगी शिवाजीराव दळणर. ज्यांनी डोंगराळ भागातील मागासलेल्या समाजातील मावळयांना (माणसांना) एकत्र करून परभणी जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेर सुद्धा कार्यकर्ता ते लोकनेता म्हणून अस्तित्व उभे केले. श्रीमंतयोग्यागसारखी न्यायबुद्धी आणि सर्वधर्मसमभावतेची दृष्टीत निष्णांत जगण्याची प्रचिती घडविते. त्या आधारे आदर्श निर्माण करून उदंड राजकारण केले. उदा. त्यांनी जिल्हा परिषद, विधानसभा इ. निवडणुरकीमध्ये रणांगण गाजविलेले चिरस्मरणीय आहे. महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. राजकीय पक्षीय बांधिलकी जपत किंवा सामाजिक ऋण (धनगर समाज) परतफेड करण्यास्तव आपल्याा मधाळ वाणीने आणि परिसस्पर्शी वृत्तीमधून जिव्हाळयाने माणसे जोडली. संगटन मजबूत केले. महाराष्ट्राधर्म भावना (धार्मिक - सामाजिक भावना) वृध्दिंगत केली. कित्येक मेळावे घेतले. सोहळे साजरे केले. ज्या कार्यामधून सामूहिक अस्मिता जोपसली आणि राजकीय आणि सामाजिक कार्याचा विराट विस्तार केला. यामधून सत्कर्म, सदाचार, सदुणांचा अवतार पुन्हा पुन्हा होत असतो, याची प्रचिती दळणर सरांच्या रूपाने आपणास येते.

विविध क्षेत्रांमधील गरीब- श्रीमंत, प्रगत-अप्रगत, उच्च -नीच, हीन-दीन, सामान्य-अतिसामान्य अशा सकल मानव जातीचा आशेचा किरण बनून त्यांचे विचार आणि कार्य सदैव पथदर्शी आहे. त्यांचे लोकवशीकरणाचे तंत्र खरोखरच आगळे आहे. ज्यामुळे सहवासात आ-लेला माणूस मित्रभाव जपतो. माणसांच्या ह्रदयामध्ये जागा निर्माण करणे अवघड काम आहे. सभोवतीच्या वास्तवात एखादा भूखंड (जागा) मिळविणे सोपे आहे. परंतु एखाद्या माणसांच्या मनामध्ये जागा बनविणे किंवा आपुलकीचा कोपरा तयार करून यासोबतच सामान्य माणसांच्या ह्रदयसिंहासनावर अधिराज्य् गाजविणे महा कठीण काम आहे. निष्कलंक चारित्र्य, निर्मळ जगणे, निष्कपट व नि:पक्षपातीबुद्धी यामुळे माणसे निरोगी आणि निरामय जगतात. त्यांच्या आचार-विचार-उच्चारांमधून नकळत प्रभाव पडतो. जरब - वचक निर्माण होते. परिणामी लोकांना उदयमशीलता जाणवते. अशांच्या ठायी तेजस्विता आणि स्वाभिमान ठासून भरलेला असतो. आपल्यी कुटुंबातील, सहवासातील, वलयातील आणि जिव्हाळयांच्या माणसांबद्दल स्वप्रजावत्सलता पाझरत असते. ते विशिष्ट चाकोरीत न बसणा-या व्यक्तित्वांचे धनी व माणुसकीचा दीपस्तंभ असतात. दीन-हीन माणसांच्या उत्कार्षासाठी सातत्याने झगडतात. कर्मप्रामाण्यवादी, उमेद जागविणारे प्रज्ञावंत, समाजकार्यासाठी सदैव तत्पर, कीर्तिरूपे समृद्धीचे निर्माण करणारे कर्मयोगी, समाज दिशादर्शक, कुटुंबवत्सल आणि निर्भय व्यक्तिमत्व, सामाजिक

कार्याचे संदेशक, अशा असामान्य गुणज्ञतेची मांगल्यमूर्ती असतात. यासर्व गुणज्ञतेचे प्रतीक म्हेणजे दळणर सर आहेत.

संत जनाईच्या जन्मामुळे आणि पावन स्पर्शाने पुनित झालेल्या सांस्कृतिक वैभवसंपन्न गंगाखेड शहर व तालुका परिसरातील, रेणुकामातेच्या शक्तीपीठ वारसा जतन करणाऱ्या राणीसावरगाव येथे सरांचे दीर्घकाळ वास्तव्य आहे. येथेच कर्मभूमी बनविले आहे. पुण्यश्लोक निर्माण केलेले आहे. राणीसावरगाव नजिकची पोखर्णी देवी हीच सरांची जन्म भूमी. परंतु राणीसावरगावच्या अगदी निकटचे ठिकाण आणि राणीसावरगाव येथील वास्तव्यच यातून तिथे कर्मभूमीही बनविली. ही अतिशय अफलातून कामगिरी असून डोंगराळ, खडकाळ, सर्वच दृष्टीने मागास परिसरात आणि अतिदुर्गम भागात आपल्या कार्याचा प्रभाव निर्माण करून सामान्य माणसांसमोर दीपस्तंभ उभा करण्यासाठी आणि हे प्रचंड मोठे आवाहन पेलण्यासाठी खूप मोठी आंतरिक ऊर्जा लागते. अशी आंतरिक ऊर्जा घेऊन यशोशिखर गाठणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व या भूमीचे वैभव आहे. वारकरी संप्रदायांतील जनाईच्या कर्तृत्वाचे उत्तरदायित्व अभिमानाने मिरवित कीर्तन, प्रवचन, भजन, सोहळे-सप्ताह या सांस्कृतिक कार्यातून राणीसावरगाव परिसरात चैतन्यमय बनविण्याचे बाळकडू जन्मापासूनच वडिलांकडूनच घेऊन जन-मनांमध्ये आपुलकीचे स्थान निर्माण केले ही अफलातून यशस्विता ज्यांना लाभली अशी माणसे सामान्य माणसांचे आशास्थान बनतात. काळ- परिस्थितीच्या पुढे जाऊन लोकांसमोर आदर्श निर्माण करतात. मला असे वाटते की, मा दळणर सर याबाबतीत सकल गुणसंपन्न आहेत. त्यामुळेच या परिसरात सांस्कृतिक संचिताला कवेत घेऊन खेडयातील सामान्य माणसांना सरांनी लळा लावला त्यांच्याशी सुसंवाद साधला.

वारकरी संप्रदायातील विचारसरणीला अनुसरून ज्ञानेश्वरी, सकल संत अभंगगाथा, रामायण, महाभारत आणि बहुतांश पौराणिक धर्मग्रंथाचे प्रगाढ अध्ययन केले. त्या प्रभावातून सामान्ये भोळयाभाबडया जनांना ज्ञानाची शिदोरी वाटू लागले. हा ज्ञानयज्ञ आधुनिकता आणि पारंपारिकतेचा उत्तमोत्तम सुवर्णमध्य साधत अव्याहतपणे चालू ठेवला. ज्यामुळे या परिसरातील वाडी - तांडयावर सकारात्मक बदल घडले आणि घडत आहेत. दऱ्याखोऱ्यात राहणारा, कडे-कपारीत वास्तव्य करून आदिमतेचे जीवन व्यतीत करणारा समुदाय सर्वांग बदल अव्हेरून नावीन्यपूर्ण जगतामध्येत वावरत आहे. वारकरी शिकवण व आचरण, व्यसनमुक्ती, शैक्षणिक उन्नयनामधून सन्मानाचे परिवर्तनशील जगणे अनुभवत आहे. यावरून मला असे वाटते की, हा माणूस म्हणजे या परिसरातील परिसरूपी जाज्वल्य व निर्माणामध्ये चैतन्यू बनून सर्वांग क्रांतीची बीजे पेरत राहिले. त्यांचा भक्कम आधार ज्ञानोबा- नामा- जनाई - तुकोबाचे मार्गक्रमण. म्हणूनच त्योंच्यासम समकालीन कर्मयोगी विरळाच, असे दिसते.

'बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले' अशा संतोक्ती प्रमाणे कृती आणि उक्तीमध्येच साम्य ठेवून सामाजिक कृतज्ञता प्रकटीकरणांमधून कौटुंबिक, सामजिक, पारंपरिक सोहळे-ओवळे सामाजिक दायित्वाचे द्योतक बनविले पाहिजे, या जाणिवेतून समाजऋण परतफेड करण्यासाठी आदर्श विचार करणे आणि रुजविणे महत्वाचे ठरते. याकरिता आगळेवेगळे करावे



लागते. उदा. पाणी परिषदेच्या माध्यमामधून सामाजिक पाणीप्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे पुरेसे नसते, केवळ मंचावर विचार प्रकटन करून चालत नाही, तर त्यास कृतींची जोड द्यावी लागते. याच जाणिवेमधून शेजारच्या गावातील / परिसरातील नाला खोलीकरण, नालासफाई आणि त्यावरील बंधारा निर्माण याकृती शाश्वत सत्यवर्तनाची साक्ष देणाऱ्या ठरतात.

'मातृ-पितृ देवो भव' या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करताना आई- वडीलांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी सोहळे संपन्न करण्यायची प्रथा समाजात आढळते. अशा प्रथा-परपरांना सामाजकार्याची जोड देऊन त्या निमित्ताने अतिशय निष्ठापूर्वक कृतज्ञताभाव सांभाळण्याची हातोटी ज्यांच्याकडे असते, तेच लोकसंग्रह वाढवितात. या पारंपरिक आस्था् निभावताना त्यांनी सार्वजनिक ऋण परतफेड करण्यासाठी विविध उपक्रमांची जो देऊन ते राबविणे हे महत्तकठीण कार्य सरांनी केले. तसेच अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने जनकल्याणकारी आणि लोकप्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले, आपण स्वतः कीर्तन - प्रवचनामधून लोकरंजन आणि उद्‌बोधन घडवून समाजजागृतीचे उत्तर दायित्व निभावले. याबाबी 'शहाणे करूनी सोडावे सकलजन' या संतोक्ती प्रमाणे जनहितार्थ आहेत. कीर्तन सोहळयांना जोडून मोफत आरोग्य् तपासणी शिबीर, पशु चिकित्सां, रक्तदान शिबीर, मनोरंजनपर आणि लोकजागृतीस पूरक व्याख्यानांचे आयोजन, राष्ट्रीय संविधान मूल्यांना अनुलक्षून समाजजागृतीपर कार्यक्रम इत्यादी संपन्नोतेमधून कालसुसंगत नित्य नूतन सामाजिक उपक्रमांची जोड दिली. अशा अनंत बाबी सामान्या माणसांना स्फूर्तिदायी आहेत. ज्याबाबी सरांनी दैनंदिन जगण्याचा अविभाज्य. भाग बनविलेल्या आहेत.

प्रा. दळणर सरांनी अंबड येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थे्च्यां कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून २० वर्षे प्रदीर्घ सेवा केली. त्यांअंतर्गत उपप्राचार्य पदाचा पदभार समर्थपणे सांभाळल्यानंतर संस्थे्कडून प्राचार्यपदासाठी आपल्या् नावाचा विचार केला जात नाही, सोयीच्या् माणसाची नियुक्ती् करण्यात येते, अश-वेळी भडकलेले सर संस्थाकचालकांना संतापाने सडेतोड बोलून क्षणाचाही विलंब न करता कायमस्वरुपी नोकरी सोडून निघून येतात. ही घटना लोकाग्रणींनी बोध घेण्या सारखी आहे. सामान्य वाचक-श्रोत्यांना प्रेरक आहे. सुशिक्षित सामान्यजनांना स्वतः अस्तित्व निर्माण करण्यास स्फुरण चढविणारी आहे. बाहू मजबूत बनून स्वयंसिद्धतेची ऊर्मी जागविणारी आहे. अशा आठवणींची साठवण खूप आहे. जीवनाला कलाटणी देणारे असे कित्येक चित्तथरारक घटना- प्रसंग मरगळलेल्या मानवी मनाला उभारी आणणारे आहेत.

विद्यापीठीय सभागृहात कामगिरी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद (तत्कालीन मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद) आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या दोन नियमित विद्यापीठात सरांनी सभागृहामध्ये आणि सभागृहाबाहेर बहुमोल आणि चिरस्मरणीय कामगिरी केलेली आहे. महाराष्ट्रे विद्यापीठ कायदा - १९९४ आणि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम - २०१६ मधील तरतुदींनुसार अनेक प्राधिकरणामध्ये नेतृत्व

केलेले आहे. ते कामकाज उच्चशिक्षण क्षेत्रामध्ये मैलाचा दगड ठरते. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शैक्षणिक व नियोजन मंडळ, विद्यापरिषद, शैक्षणिक सभा, सिने (अधिसभा) सदस्यष, व्यवस्थांपन परिषद सदस्य, विविध चौकशी समितीमधील कार्य, निवड समिती, पाहणी समिती, पडताळणी समिती, तात्पुरत्या सेवेतील प्रलंबिताचे प्रश्न सोडविणे, अशा बहुविध कामगिरीमधून दळणर सरांनी न्याय भूमिका घेऊन सकारात्मक कामगिरी केलेली आहे. संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक आणि एक लढाऊ बाणेदार कार्यकर्ता म्हणून आपल्या कार्याची मोहर उमटविली. अशा उच्च शिक्षण क्षेत्रातील लोकशाही मूल्यांसाठी सातत्याने झगडणा-या योद्ध्यास विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थी - कर्मचारी आणि प्राध्यापक शतशः वंदन करीतच आहेत आणि करीतच राहतील. त्यांचे कार्य नंदादीपासारखे चिरंतन स्फूर्तिदायी, उजाळा देणारे आणि चैतन्य निर्माण करणारे ठरले असून ते विद्यापीठीय वाटचालीमध्ये ऐतिहासिक स्वरूपाचे आणि सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यासारखे आहे.

ज्ञानेशांच्या पसायदानातील काव्यपंक्ती मधील 'दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो। जो जे वांच्छिल तो तें लाहो। प्राणिजात' याप्रमाणेच श्री दळणर सरांचे शैक्षणिक कार्य अद्वितीय आहे. इ स २००१ मध्ये राणीसावरगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयाची स्थापना करण्यात् आली. या महाविद्यालयाने महाराष्ट्रामधील तत्पूर्वीच्या, सोबतच्या आणि नंतरच्या महाविद्यालयामध्ये अग्रेसर ठरत प्रगतीचा आलेख उंचावला आहे, नूतन मॉडेल साकारले आहे. त्यामुळे उच्च शिक्षणक्षेत्रातील विद्यापीठ परिक्षेत्रांमध्य् आणि परिक्षेत्राबाहेर शैक्षणिक संकुलाचे पुण्यश्लोक निर्माण झालेले आहे, याचा सार्थ अभिमान आहे. मराठी अभ्यास मंडळांच्या निवडीनंतर सरांसोबत मुक्त चर्चा झाली. या चर्चेत सरांनी कल्पना विशद केली की, संत तुकाराम आणि बाबासाहेब आंबेडकर म्हणजे 'संत तुकारामांची अभंगगाथा' आणि 'भारतीय संविधान' असा तौलनिक अभ्यास झाला पाहिजे. या करिता अभ्यासक पुढे यावेत. याविषयाच्या अनुषंगाने आगामी संशोधन कार्याबद्दलचे चिंतन प्रकट झाले. त्यामधून पारंपरिकतेला आधुनिकतेची सांगड घालण्यांची सरांची दूरदृष्टी हीच वैभवसंपन्न - दैदीप्यमान वाटचालीचे गमक असल्यानचे मला जाणवले.

चळवळी हे मानवी उन्नतीचा महामार्ग असतात. सरांचा विविध चळवळीमध्ये सहभाग राहिला. बालपणापासून चळवळणारे चैतन्यदायी व्यक्तिमत्व लाभल्यामुळे चळवळींच्या मुशीं-तून जडणघडण होत गेली. वारकरी संप्रदायातील विचारसरणीचे बालमनावरील संस्कार आणि त्यातूनच कीर्तन परंपरेशी नाळ जोडली गेली. एक उत्कृष्ट वक्ता, प्रवचनकार, विचारवंत, समाजसुधारक इ. बहुविध पैलूंचा विकास घडला. ज्यामधून चळवळी निर्माण करणे आणि त्यात कार्य करणे हा वारसा तयार झाला. सामाजिक - राजकीय- शैक्षणिक चळवळींमध्ये अग्रभागी राहून सरांनी लोकसंघर्ष पेटविले आणि लोकशाहीमूल्यांची जाण ठेवून सामाजिक चळवळींना बळकट करण्यामध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. उदा. धनगर समाज आरक्षण लढा, समाज संगठन आणि आरक्षणासंदर्भात न्यायालयीन लढाई अथवा इतर सामाजिक चळवळींमध्ये सरांचे कार्य अनमोल आहे. सरांनी राजकीय चळवळीमध्ये समर्थ उत्तरदायित्व



निभावले. सामान्य कार्यकर्ता ते शिवसेना जिल्हाप्रमुख पदावरील त्यांचे काम ऐतिहासिक ठरले आहे. सामाजकारणामधून राजकारणाची साध्यता म्हणजे इस २०१४ मधील गंगाखेड विधानसभा निवडणुकीतील सरांचे यश ! हे सामान्यजनांना चिरंतन प्रेरणादायी आहे. शैक्षणिक चळवळीमधील सरांची वाटचाल प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक अशा बहुविध पातळीव-रील आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि मानवविद्या शाखेचे अधिष्ठाता ही उल्लेखनीय बहुमानाची पदे सरांनी न्याय्‌बुद्धीने भूषविली आणि त्यापदावरून विद्यापीठ प्रशासनामध्ये कामकाज करताना आपल्या् कार्याची मोहोर उमटविली.

असा निराळा समाजधुरीण म्हणून सरांच्या कार्याचा मागोवा घेत असताना संत, महंत, समाजसुधारक, महामानव, विचारवंत यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्शसमोर ठेऊन पारंपरिकतेला आधुनिकतेचा अजोड सांधा आपल्या कार्याचा सुवर्णरथ पैलतीरावर घेऊन जाणारे महायोद्धे म्हणून सरांचा गौरव अटळ आहे. म्हणूनच गौरवग्रंथ काढण्यात येत आहे. त्या औचित्याने गुणचिंतन करताना वैचारिक मंथनातून महाराष्ट्र पेटविणारा माणूस, मला किंवा माझ्या सारख्या असंख्य माणसाचे 'अमोघ वक्तृत्वाचे धनी', सत्वशील माणूस, व्यासंगी, चिकित्सक, समीक्षक, मैत्री- जिव्हाळा जपत स्वतःचे विश्व उभे करण्याची चिरंतन प्रेरणा देणारे कर्मयोगी, बहुजनांचे आधारवड, सदैव कार्याचा सुगंध दरवळत राहील असे स्व कर्तृत्वाची जाण आणि सामाजिक भान देणारे उत्तुंग व्यक्तिमत्व, विद्यार्थीप्रिय शिक्षक, व्यावहारिक आणि कौटुंबिक पातळीवरील वात्सल्यसिंधू अशा अनंत गुणसमुच्चायाचा नंदादीप सदैव तेवत राहील आणि त्याचे तेज आगामी पिढयांना कार्यप्रवण बनवून उजळत राहतील, चिरप्रेरक राह-तील. अशा अज्ञान - अंधःकारामध्ये अडकलेल्या आज्ञ-बहुजनांना स्फुरण चढविणारी अशी तेजोमयमूर्ती म्हणजे दळणर सरांचा महिमा अगाध राहील. ते सभोवती वावरत असताना एक सुंदर-चैतन्यमय जग संचारत असल्या ी अनुभूती आपणास येते. परंतु प्रदीर्घ सेवेनंतर ३० जून २०२० रोजी शासकीय नियमानुसार नियत वयोमानानुसार सर सेवानिवृत्त होत आहेत. अशा अनंत गुणज्ञ, निर्मोही, निरालस, निष्कलंक, प्रज्ञावंत, शीलवंत सरांना पुढील आयुष्य निरोगी, निकोप आणि निर्भयतेने जगण्याचे बळ मिळो ! सरांना आगामी काळात समाधान लाभो, त्यांच्या कुटुंबियांची भरभराट, उत्कर्ष आणि उन्नती होवो ! याकरिता मनोमन अनंत मंगलमय प्रार्थना !!